मोरोपंतांनीं श्रीतुलसीदासांवर अनेक स्तुतिसुमनें वाहिलीं आहेत. तीं पाहण्यासारखीं आहेत—

भुलसी विषया येणें उलसील महासुखें ॥
कुलशीलमदत्यागीं तुलसीदास गा मुखें ॥१॥

तसेंच,

श्रीतुलसीदासस्तव

श्रीमद्रामपदाब्जीं अलि तुलसीदास हा सदा गावा ॥
मागावा वर ' हरिजन भक्त भवपथीं कधीं न भागावा' ॥१॥
श्रीवाल्मीकिच झाला श्रीतुलसीदास रामयश गाया ॥
तरिच प्रेमरसाची खाणी वाणी तशीच वशगा या ॥ २ ॥
तुलसीदासें रचिलीं श्रीमद्रामायणें स्वयें सप्त ॥
ज्यांच्या श्रवणें निवतो संसारी जीव जो सदा तप्त ॥ ३ ॥
सेविति तुलसीदासें रचिल्या रामायणाख्य सुरसा जे ॥
पुण्ययशें कोणीही स्वर्गांत तयांपुढें न सुर साजे ॥ ४ ॥
तुलसीदासाची सुख देती श्रोत्यांसि नित्य नव दोहा ॥
सेवितया हे म्हणते जैशी श्रीरामकीर्ति न वदो हा ॥ ५ ॥
याचें सुप्रेमभवन कवन निववितें सदा बुधा सरसें ॥
हें जों जों सेवावें तों तों सेव्यचि गमे सुधासरसें ॥ ६ ॥
राम प्रसन्न झाला तुलसीतें, जयिं पवनतनयातें ॥
साक्षात्कार असा ज्या, होइल जन कोण अवनत न यातें ? ॥७॥
यवनपति म्हणे 'तुलसीदासा ! दाखीव राम तो, बाहें '॥
कपि लाखिती म्हणाया त्या, व्यापुनि नगर धाम ' तोबा' हें ॥८॥

ते दाशरथी तुलसीदासमठद्वारपाल चोरांनीं ॥
अवलोकिले; बहु तपुनि वपु नियमुनि, कृश करूनि, थोरांनीं ॥९॥
बापा तुलसीदासा ! तुलसी दासामरद्रुरामासीं ॥
तैसेंचि तुझें नाम प्रभुच्या झालें समान नामासी ॥ १० ॥
हा पुण्यकीर्ति सन्मत, म्हणतिल कवि कां न रामसम याला ॥
जो ज्यास पूज्य तो त्या ईश म्हणे जेविं तामस मयाला ॥११॥
कवि म्हणति 'आपणांतें राम तसे भक्त वर्ण्य कुलशील '।
तुलसी लक्षजनस्तुत यासीं, या स्तवुनि, तूंहि तुलशील ' ॥१२॥
वंद्य स्तुत्य सदा हा श्रीरामसमान वासवा तुळसी ॥
पथ्या उक्ति हरिजना हे, तामस मानवास वातुळसी ॥ १३ ॥
श्रीकृष्णमूर्ति जेणें केली श्रीराममूर्ति सज्जन हो ! ॥
रामसुत मयूर म्हणे 'त्याच्या सुयशोऽमृतांत मज्जन हो ' ॥१४॥